◆ बुलडाणा ◆ वर्ष - 3 ◆ अंक - १८२ ◆ पृष्ठे - ४ ◆ RNI No . MHBIL/25/A1435 ◆ batamijagata@gmail.com ◆ मुख्य संपादक : कैलास हरीभाऊ राऊत - 9561596693 ◆ मानद संपादक : गणेश निकम

दैनिक शनिवार २६ जुलै २०२५

आवाज जनसामान्यांच्या हक्काचा

# बातमी जगत

## TRENDING NEWS

**सैयारा चित्रपटाच्या यशानंतर पहिल्यांदाच दिसली अनित पड्डा:चाहत्यांना सेल्फी देण्यास नकार दिला, पापाराझींनाही टाळताना दिसली**



■ पान ४ वर

## निधन वार्ता

### मोटारपंप व केबल लंपास

**बाभुळगाव :** कोठा अलिपुर उजाड शेतशिवारातुन मोटारपंप व केबल लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी फिर्यादीच्या शेतातील इलेक्ट्रीक मोटार व केबल तसेच शेजारील इतर शेतकऱ्यांच्या शेतातील मोटारपंप व केबल असा एकुण ३६२०० रूपयाचा मुद्देमाल लंपास केला. नितीन दिलीप चकोले यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

### अपघातातील जखमीचा मृत्यू

**कळंब :** अपघातातील जखमीचा मृत्यू झाल्याची घटना घडली. याप्रकरणी नरेश उपासराव वाघमारे हा घरून शेताकडे जात असतांना समोरून येणाऱ्या बस वाहन क्र. एम.एच. ४० एन ८९४१ च्या चालकाने वाहन हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन नरेशला धडक दिल्याने तो उपचारा दरम्यान मरण पावला. याप्रकरणी बिंबेश्वर उपसराव वाघमारे यांच्या तक्रारीवरून बस वाहन क्र. एम.एच. ४० एन ८९४१ च्या चालकाविरूध्द गुन्हा नोंद केला.

### जुन्या भांडणावरून वाद

**दिग्रस :** जुन्या भांडणावरून वाद केल्याची घटना घडली. याप्रकरणी एका दिवसापूर्वी झालेल्या भांडणाच्या कारणावरून फिर्यादीस शिविगाळ करून दगडाने कानाजवळ मारहाण करून जखमी केले. ही घटना ११ जुलै रोजी घडली. याप्रकरणी मनोज नारायण आडे यांच्या तक्रारीवरून महेश मसाराम चव्हाण विरूध्द गुन्हा नोंद केला.

### शेतीच्या कारणातुन वाद

**उमरखेड :** शेतीच्या कारणातुन वाद केल्याची घटना घडली. याप्रकरणी फिर्यादीच्या शेतामध्ये ऊस पिक लावुन असलेल्या शेतात अनाधिकृतपणे प्रवेश करून फिर्यादीच्या शेतात ट्रॅक्टरने ड्रायव्हर नांगरत असतांना त्याला धमकी दिल्याने तो अर्धवट काम सोडून गेल्याने फिर्यादीचे नुकसान झाले. याप्रकरणी विश्वनाथ तुकाराम कोंडरवाड यांच्या तक्रारीवरून प्रसन्नकुमार कोंडरवाड विरूध्द गुन्हा नोंद केला.

### दुचाकी लंपास

**वणी :** मच्छी मार्वेâट परिसरातुन दुचाकी लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी वाहन क्र. एम.एच. २९ सीसी १३६७ काळ्या रंगाची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी मारोती अर्जुन भानारकर यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

### मोटारपंप व केबल लंपास

बाभुळगाव : कोठा अलिपुर उजाड शेतशिवारातुन मोटारपंप व केबल लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी फिर्यादीच्या शेतातील इलेक्ट्रीक मोटार व केबल तसेच शेजारील इतर शेतकऱ्यांच्या शेतातील मोटारपंप व केबल असा एकुण ३६२०० रूपयाचा मुद्देमाल लंपास केला. नितीन दिलीप चकोले यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

# कॅबिनेट बदलाची चर्चा

## उलथापालथीचे संकेत:फडणवीस-शहा 25 मिनिटे भेट

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**मुंबई :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. २५ मिनिटे चाललेल्या या भेटीने राज्यातील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली आहे. मंत्रिमंडळात फेरबदलाची चर्चा सुरू झाली आहे. महायुतीतील तिन्ही पक्षांच्या काही मंत्र्यांची खाती बदलली जाणार असे म्हटले जात आहे. विधिमंडळ अधिवेशनात मोबाईलवर रमी खेळताना आढळल्याचा आरोप असलेले कृषिमंत्री माणिकराव कोकाटे रडारवर आहेत. तशी तयारी सुरू असल्याची माहिती खुद्द कोकाटेंचे नेते, उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिली.



अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी धनंजय मुंडेंना पुन्हा मंत्रिमंडळात घेण्याचा विचार होऊ शकतो, असे वक्तव्य केले. विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकरांच्या जागेवर विदर्भातील नाराज नेते सुधीर मुनगंटीवार विधानसभा अध्यक्ष होतील. नार्वेकरांना मंत्रिपद दिले जाणार, अशी जोरदार चर्चा आहे. मात्र, काही राजकीय अभ्यासकांच्या मते महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकीच्या तोंडावर फार मोठे बदल होण्याची शक्यता नाही.

### धनंजय मुंडेंना पुन्हा मंत्री करण्याचा विचार : भुजबळ

**पुणे येथे मंत्री भुजबळ म्हणाले की, धनंजय मुंडेंना कृषी खात्यातील आरोपांसंदर्भात क्लीन चिट मिळाली आहे. त्यामुळे त्यांना पुन्हा मंत्रिपदाचा विचार होऊ शकतो.**

### मंगळवारी कोकाटेंविषयी निर्णय घेईन : अजित पवार

**चव्हाणच्या मारहाणीनंतर घाटगेंनी अजित पवारांची भेट घेतली. सोमवारी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून मंगळवारी कोकाटेंविषयी निर्णय घेईन, असे अजित पवार म्हणाले.**

# 25 अश्लील ओटीटी ॲप्सवर बंदी

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**मुंबई :** केंद्राने अश्लील, असभ्य आणि काही प्रकरणात पोर्नोग्राफी चित्रणाचे प्रक्षेपण करणाऱ्या उल्लू आणि ऑल्ट बालाजीसह २५ ओटीटी प्लॅटफॉर्म बंदीचे आदेश दिले. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने गृह मंत्रालय, महिला आणि बाल विकास मंत्रालय, इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्रालय, विधी मंत्रालय, फिक्की, सीआयआय आणि बाल अधिकार विशेषतज्ज्ञांच्या सल्ल्यानंतर ही कठोर कारवाई केली आहे.

चिंता: यावर महिलांचे चुकीचे चित्रण झाल्याचा आरोप : राष्ट्रीय बाल संरक्षण आयोगाने या प्लॅटफॉर्म्सवरील प्रक्षेपण मुलांसाठी नुकसानदायक असल्याचे सांगितले होते. अनेक सामान्य नागरिकांनीही त्याला समाज-विरोधी आणि अश्लिल म्हटले होते. पालक आणि शिक्षकांनी असे प्रसारण मुलांसाठी नैतिकदृष्ट्या वाईट असल्याचे म्हटले होते. फेब्रुवारीत लोकल सर्किल्सच्या सर्वेत समाविष्ट यूजर्सनी ओटीटी प्लॅटफॉर्म्सवर अश्लिल आणि आक्षेपार्ह दृश्ये वाढण्यावर चिंता व्यक्त केली होती. सर्वेतील ८१% लोकांनी आक्षेप नोंदवला. ६४% नी म्हटले, प्लॅटफॉर्म सुधारणार नाहीत. उल्लू, ऑल्ट बालाजी, बिग शॉट्स ॲप, बूमेक्स, नवरसा लाइट, गुलाब ॲप, कंगन ॲप, बुल ॲप, जलवा, शोहिट, वॉव एंटरटेनमेंट, लुक एंटरटेनमेंट, हिट प्राइम, फेनीओ, शोएक्स, सोल टॉकीज, अड्डा टीव्ही, हॉटएक्स व्हीआयपी, देसीफ्लिक्स, हलचल, मूडएक्स, नीयनएक्स व्हीआयपी, फ्यूगी, मोजफ्लिक्स व ट्रिफ्लिक्स. ऑल्ट बालाजी, एकता कपूरच्या बालाजी टेलीफिल्म्सची सहायक कंपनी, तर उल्लू ॲप, आयआयटीयन विभु अग्रवाल मालकीचे आहे.

# बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी

## वैतागलेल्या प्रियकराने प्रेयसीचा केला खून, दौलताबाद घाटात मृतदेह फेकत पोलिस ठाण्यात हजर

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्रात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होताना दिसत आहे. कुठे अपहरण केले जात आहे, तर कुठे थेट हत्या केली जात आहे. अशीच घटना छत्रपती संभाजीनगर येथे घडली आहे. पैशांची मागणी आणि खोटा बलात्काराचा गुन्हा दाखल करण्याच्या धमक्यांना कंटाळून प्रियकराने प्रेयसीचे डोके दगडावर आपटून निर्घृण खून केल्याची घटना समोर आली आहे.

प्रेयसीच्या धमक्यांना कंटाळून प्रियकराने तिचा खून करत मृतदेह दौलताबाद घाटात फेकून दिला व त्यानंतर आरोपीने थेट पोलिस स्टेशन गाठले. गुरुवारी दिनांक 24 जुलैच्या रात्री ही घटना घडली असून शुक्रवारी सकाळी संपूर्ण प्रकरण उघडकीस




आले. दिपली गणेश आस्वार (वय 19, रा. माळीवाडा, ता. कन्नड) असे मृत युवतीचे नाव असून आरोपीचे नाव सुनील सुरेश खंडागळे (वय 21, मांडकी, ता. वैजापूर) असे आहे. गुरुवारी सुनीलने वडिलांची दुचाकी घेऊन कन्नड गाठले. तिथे दिपलीला भेटला व त्यानंतर ते वेगवेगळ्या ठिकाणी फिरले. संध्याकाळच्या सुमारास ते दौलताबाद घाटात गेले. तिथे गप्पा मारताना दोघांत वाद सुरू झाले. वादाचे मूळ कारण म्हणजे दिपलीने एक लाख रुपयांची मागणी केली. तसेच पैसे न दिल्यास बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल करेन, अशी धमकी दिली. या प्रकराने सुनील संतप्त झाला व रागाच्या भरात येऊन त्याने दिपलीचे डोके दगडावर जोरात आपटले. यातच दिपलीचा जागीच मृत्यू झाला. सुनीलने मृतदेह घाटात खाली ढकलून दिला व तिथून तो निघाला. घटनास्थळावरून निघून काही तासांनी सुनील शिऊर पोलिस ठाण्यात गेला व खुंनाची कबुली दिली. सुनीलने दिलेल्या मांहितीनुसार शिऊर सहाय्यक पोलिस निरीक्षक वैभव रणखंब यांनी तातडीने दौलताबाद पोलिसांना माहिती दिली. पोलिस निरीक्षक रेखा लोंढे यांच्या मार्गदर्शनात पथक घटनास्थळी पोहोचले व मृतदेह शोधून काढला. आरोपी सुनील खंडागळेला ताब्यात घेऊन त्याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस पुढील तपास करत आहेत.

# खात्याला मूर्ख मंत्री भेटलाय, चोर साला

## आमदार शरद सोनवणेंकडून अपशब्दांचा वापर!

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**पुणे :** खात्याला मूर्ख मंत्री भेटलाय, चोर साला, अशा शब्दात अपक्ष आमदार शरद सोनवणे यांनी राज्याच्या मंत्री महोदयांबद्दल अपशब्द वापरले असल्याचे एका व्हिडिओमधून समोर आले आहे. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर शरद सोनवणे यांनी यावर खुलासा देखील केला आहे. मी असे बोललो पण ते मंत्र्यांना उद्देशून नव्हते तर घोडेगाव प्रकल्प विकास अधिकाऱ्याबद्दल असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

व्हिडिओमध्ये आमदार शरद सोनवणे म्हणतात, कसला मंत्री भेटलाय आपल्याला. आता मी मुख्यमंत्र्यांसमोर त्यांना उभे करणार आहे. सोबतच घोडेगाव प्रकल्प विकास अधिकारी प्रदीप देसाईंची सुद्धा झाडाझडती करणार आहे. आदिवासी खात्याचे मंत्री व अधिकाऱ्यांविषयी बोलताना शरद सोनवणे यांनी या भाषेचा वापर केला. व्हिडिओ समोर आल्यावर शरद सोनवणे यांनी यावर कबुली देखील दिली आहे. शरद सोनवणे म्हणाले, मी असे बोललोय पण ते मी मंत्र्यांना उद्देशून नव्हे तर घोडेगाव प्रकल्प विकास अधिकारी देसाईबद्दल बोलल्याचा खुलासा सोनवणेंनी एका वृत्तवाहिनीशी फोनवर बोलताना केला. आदिवासी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी आज जुन्नरमध्ये बैठक होती. या बैठकीत आदिवासी समाजाच्या विकासासाठी असलेल्या घोडेगाव प्रकल्पाचे अधिकारी देसाईंची मी झाडाझडती घेतली. ते समाजाच्या हिताचे काम करत नाहीत, त्यांच्याविरोधात माझ्या खूप तक्रारी आलेल्या आहेत. या देसाईंना गोरगरिबांचे काही पडलेले नाही, असे असताना देसाई मंत्र्यांच्या मात्र पुढे-पुढे करतो. त्यामुळे, मी देसाईंवर संतापलो. त्याच देसाईंना मी संबंधित खात्याचे मंत्री आणि मुख्यमंत्र्यांसमोर उभे करुन, झाडाझडती घेणार. पुढे बोलताना शरद सोनवणे म्हणाले, आपल्याकडे असलेल्या व्हिडीओमधील संताप हा मंत्र्यांबद्दल नव्हे तर अधिकाऱ्याला उद्देशून असल्याचे सोनवणेंचे म्हणणे आहे. पण, हा संवाद ऐकल्यावर प्रथमदर्शनी तर ते मंत्र्यांना उद्देशून बोलल्याचे जाणवत आहे. त्यामुळे, एक सत्ताधारी आमदार आपल्याच महायुती सरकारमधील मंत्र्याला उद्देशून असे शब्द वापरत असतील, तर सर्व सामान्यांची काय अवस्था असेल, असा सवाल उपस्थित होत आहे.

# निवृत्तीनंतर कोणतेही शासकीय लाभाचे पद स्वीकारणार नाही

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**अमरावती :** सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान सरन्यायाधीश आणि महाराष्ट्राचे सुपुत्र असलेले भूषण गवई यांनी निवृत्तीनंतर कोणतेही शासकीय लाभाचे पद स्वीकारणार नसल्याचे म्हटले आहे. मी निवृत्तीनंतर जास्तीत जास्त वेळ दारापूर, अमरावती आणि नागपुरात या आपल्या मूळ गावी घालवणार असल्याचे गवई यांनी म्हटले आहे. सरन्यायाधीश झाल्यानंतर प्रथमच भूषण गवई हे त्यांच्या मूळ गाव असलेल्या दारापुरात पोहोचले होते. यावेळी ते गावकऱ्यांशी बोलत होते.

सरन्यायाधीश भूषण गवळी यांचे गावातील नागरिकांच्या वतीने जल्लोषात



स्वागत करण्यात आले. सरन्यायाधीशांना पाहण्यासाठी गावकऱ्यांनी देखील मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. गावात पोहोचताच गवई यांनी आपल्या लहानपणीच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच जुन्या घराला देखील भेट दिली. यावेळी सरन्यायाधीश यांनी विकंदर महाराज, राजे बुवा महाराज, हनुमान मंदिर आदी ठिकाणी भेट देऊन दर्शन घेतले. शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सरन्यायाधीशांचे अगदी उत्साहात स्वागत केले. तसेच भारत माता की जय, अशा घोषणा दिल्या. एकोप्याने राहणाऱ्या गावाचे प्रतीक म्हणजे दारापूर गाव असल्याचे सरन्यायाधीश यांनी म्हटले आहे.

# कंत्राटदाराच्या फायद्यासाठी बनावट कागदपत्रे : वाशिममधील सार्वजनिक बांधकाम विभागातील प्रकार

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**वाशिम :** सांगलीमध्ये एका तरुण ठेकेदाराने कर्जाच्या ओझ्याखाली आणि शासनाकडून कामाचे बिल वेळेवर न मिळाल्यामुळे आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना उजेडात आल्यानंतर राज्य सरकारवर विरोधकांनी जोरदार हल्लाबोल केला असून, कंत्राटदारांच्या अडचणींविषयी शासन गंभीर नसल्याचा आरोप केला जात आहे.

या घटनेची झळ अजून ताजी असतानाच वाशिम जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागात




मोठा घोटाळा उघड झाला आहे. कंत्राटदाराच्या फायद्यासाठी विभागातील एका अभियंत्याने बनावट कागदपत्रे तयार करून त्यावर सह्या केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी संबंधित अभियंत्यावर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाशिम शहरातील विकास कामे वारंवार मुदतवाढ घेऊनही पूर्ण न करणाऱ्या अजयदीप इन्फ्रा या छत्रपती संभाजीनगर येथील कंपनीवर दंडात्मक कारवाई करून काळ्या यादीत टाकण्याबाबत तक्रार करण्यात आली होती. मात्र, वाशिमच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील तत्कालीन उपविभागीय अभियंता दिनकर नागे यांनी कंत्राटदाराच्या फायद्यासाठी तक्रारकर्त्याचे बनावट पत्र तयार करत खोटी सही करुन या पत्राचा वापर केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तत्कालीन उपविभागीय अभियंता दिनकर नागे आणि लिपिक प्रिया तुपलोढे यांच्याविरोधात वाशिम शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाशिम शहरातील विकासकामांबाबत तक्रारदार राम पाटील डोरले यांनी मे. अजयदीप इन्फ्रा या कंपनीविरोधात गंभीर आरोप करत ती कंपनी काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली होती. कंपनीवर वेळेत कामे पूर्ण न करणे आणि निकृष्ट दर्जाचे काम करणे, तसेच वारंवार मुदतवाढ घेणे असे आरोप होते. मात्र, संबंधित प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नसल्यामुळे राम डोरले यांनी 5 ऑक्टोबर 2024 रोजी पोहरादेवी येथे पंतप्रधानांच्या कार्यक्रमात आत्मदहनाचा इशारा दिला होता. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून त्यांना रोखले.


# नाशिकच्या त्र्यंबकेश्वर मंदिरात पासेसचा काळाबाजार

## 200 रुपयांचा पास थेट हजार रुपयांत विक्री, 5 जणांना पोलिसांकडून अटक

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**नाशिक :** श्रावण मासारंभ झाल्याने पुढील दोन दिवसांत श्रावणातील पहिल्या सोमवारसाठी भाविकांची मंदिरांकडे मोठी गर्दी अपेक्षित आहे. याच पार्श्वभूमीवर नाशिकमधील प्रसिद्ध त्र्यंबकेश्वर मंदिराच्या दर्शनासाठी दिल्या जाणाऱ्या पासेसमध्ये काळाबाजार होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

पोलिसांनी या प्रकरणी सखोल तपास करून पाच जणांच्या टोळीला अटक केली आहे. ही टोळी त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टच्या अधिकृत वेबसाइटवरून दर्शनासाठीचे ऑनलाईन पासेस बुक करून तेच पासेस भाविकांना 800 ते 1000 रुपयांपर्यंत विकत होती.



हे पास प्रत्यक्षात फक्त 200 रुपयांना उपलब्ध असतात. या प्रकारामुळे भाविकांची लूट होत असल्याचे स्पष्ट झाले असून, पोलिस तपासात हे रॅकेट पूर्णपणे उघडकीस आले आहे. याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, या प्रकाराची गंभीर दखल घेत मंदिर ट्रस्टने ऑनलाईन तिकीट व्यवस्थेत आवश्यक बदल करण्याची तयारी सुरू केली आहे, जेणेकरून भाविकांची फसवणूक होणार नाही आणि दर्शन प्रक्रियेत पारदर्शकता राहील. भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वर मंदिरात दररोज साधारण 20 हजार भाविक दर्शनासाठी येतात. यामध्ये 5 हजार भाविकांना देणगी दर्शन दिले जाते, ज्यासाठी 200 रुपयांचे शुल्क आकारले जाते. यापैकी 3 हजार भाविकांना मंदिराच्या उत्तर दरवाजाजवळून प्रत्यक्ष पास दिले जातात, तर उर्वरित 2 हजार भाविकांसाठी ऑनलाइन पासेसची सुविधा आहे. मात्र, याच ऑनलाइन पास वितरण प्रक्रियेत मोठा घोटाळा झाल्याचे उघडकीस आले आहे. त्र्यंबकेश्वर पोलिसांनी याप्रकरणी 5 जणांच्या टोळीला अटक केली आहे. हे आरोपी बनावट नावे, आधार कार्ड नंबर आणि मोबाईल नंबर वापरून दररोज 200 ते 300 पासेस बुक करत होते आणि मंदिर परिसरात त्याची विक्री 500, 800, ते 1000 रुपयांपर्यंत करत होते. या टोळीचा "डायरेक्ट खटलं" नावाचा एक व्हॉट्सॲप ग्रुप होता, ज्यात प्रत्येकजण टोपण नावांनी सहभागी होता. या ग्रुपमधून दररोज किती पासेस काढले गेले, कोण किती विकले, याची माहिती एकमेकांना दिली जात होती. पोलिस तपासात हा सगळा प्रकार उघड झाला असून अधिक चौकशी सुरू आहे. या प्रकारामुळे त्र्यंबकेश्वरमधील भक्तांमध्ये संताप व्यक्त होत आहे. मंदिर प्रशासनाने देखील ऑनलाइन तिकीट वितरण प्रणालीत बदल करण्याची प्रक्रिया सुरू केल्याचे संकेत दिले आहेत, जेणेकरून भविष्यात अशी फसवणूक टाळता येईल.

### देवस्थान वेबसाईटवर तांत्रिक त्रुटी

**त्र्यंबकेश्वर मंदिरात ऑनलाइन देणगी दर्शन पासेसच्या काळाबाजाराचा प्रकार समोर आल्यानंतर देवस्थान ट्रस्टने वेबसाईटवरील तांत्रिक त्रुटींची कबुली दिली आहे. ट्रस्टच्या वेबसाईटवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव असून, तिकिट काढणाऱ्या व्यक्तीचे क्रॉस व्हेरिफिकेशन होत नाही, यामुळेच बनावट नावं, आधार व मोबाईल नंबरच्या आधारे मोठ्या प्रमाणावर पासेस बुक करून त्यांचा गैरवापर करण्यात येत होता. विशेष म्हणजे, ज्याच्या नावाने पास काढला आहे त्याच व्यक्तीचे ओळखपत्र मंदिरात प्रवेशाच्या वेळी तपासले जात नाही. या त्रुटीचा फायदा घेत काही टोळ्यांनी 200 रुपयांचे पास 500, 800, ते 1000 रुपयांमध्ये विक्री करत भाविकांची फसवणूक केली. देवस्थान परिसरात सुरक्षा रक्षक, पोलीस कर्मचारी नेहमीच उपस्थित असतानाही, त्यांच्या नाकावर टिच्चून हा काळाबाजार सुरु असल्याचे समोर आल्यानंतर सुरक्षा व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त पुरुषोत्तम कडलग यांनी स्पष्ट केले की, वेबसाईटमधील तांत्रिक त्रुटींची आम्ही दखल घेतली असून लवकरच यामध्ये सुधारणा केली जाणार आहे. दर्शन पासेसच्या वाटपात पारदर्शकता आणि सुरक्षा सुनिश्चित केली जाईल.**

# प्लास्टिक वाईट नाही, पण प्रक्रिया आवश्यक: सिद्धेश कदम

बातमी जगत | प्रतिनिधी

**पुणे :** प्लास्टिक वाईट असल्याचे मत अयोग्य आहे. प्लास्टिक हे उपयोगी उत्पादन आहे. मात्र प्रदूषण नियंत्रणासाठी त्याचा पुनर्वापर आवश्यक आहे, असे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी व्यक्त केले.

एन्व्हायरमेंटल क्लब ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या पर्यावरण क्षेत्रातील 'पर्यावरण जीवन गौरव' ,'पर्यावरण भूषण'आणि 'पर्यावरण गौरव' पुरस्कारांचे वितरण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम आणि विश्वेश्वर बँकेचे उपाध्यक्ष राजेंद्र मिरजे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एन्व्हायरमेंटल क्लबचे अध्यक्ष आमोद घमंडे,



सचिव गणेश शिरोडे आणि खजिनदार सचिन पाटील, पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमात पर्यावरणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या गणपतराव पाटील यांना 'जीवनगौरव पुरस्कार' तर पद्मश्री डॉ. जी. डी. यादव यांना 'पर्यावरण भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी बोलताना सिद्धेश कदम म्हणाले की, पर्यावरण संरक्षण क्षेत्रात प्लास्टिकला खलनायक ठरवले असले तरी देखील प्लास्टिक ही उपयुक्त वस्तू आहे. मात्र त्याचे प्रक्रिया करून पुनर्वापर आवश्यक आहे. त्यादृष्टीने राज्यातील पश्चिम महाराष्ट्र, कोकण व मराठवाड्यात प्लास्टिक वर प्रक्रिया करणारे प्रकल्प उभारण्यात येणार असल्याची कदम यांनी यावेळी सांगितले. शेतकऱ्यांना चांगल्या दर्जाचे बियाणे देण्याबरोबरच शेती बाबतचे प्रशिक्षण देऊन त्यांच्या मातीचे परीक्षण करण्यात आले. त्यानुसार उपाय योजना करून प्रति एकर 100 टन उत्पादन घेण्यात यश आले आहे, असे 'जीवनगौरव पुरस्कार' विजेते गणपतराव पाटील यांनी सांगितले. शास्त्रीय उपाययोजना करून तालुक्यातील क्षारपड जमीन सुपीक करण्यात यश आल्याचे त्यांनी नमूद केले. भारत सन 2047 साली शंभर वर्षे पूर्ण करत आहे. या काळात मोठी आर्थिक प्रगती करून 30 अब्ज अमेरिकन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्याचे भारताचे उद्दिष्ट आहे. मात्र, नागरिकांनी निर्धार केल्यास हे ध्येय गाठण्यासाठी 2047 साल गाठावे लागणार नाही, असा विश्वास 'पर्यावरण भूषण' पुरस्कार विजेते डॉ. जी. डी. यादव यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमात 'पर्यावरण गौरव' पुरस्कारार्थी मध्ये स्वतः भूलतज्ञ असून देखील सियाचीन आणि चंद्रपूर येथे घरांच्या उभारणीत टाकाऊ प्लास्टिकचा वापर करण्यासाठी पुढाकार घेणारे डॉ. बालमुकुंद पालीवाल, पर्यावरण प्रकल्पांना सीएसआर अंतर्गत निधी प्रदान करून प्रोत्साहन देणारे राजेश जैन यांना 'पर्यावरण गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## घटना-घडामोडी



### राज्यातील विकास प्रकल्पांसाठी मुख्यमंत्र्यांच्या दिल्लीत अनेक नेत्यांच्या भेटी

बातमी जगत | प्रतिनिधी

**नवी दिल्ली :** राज्यातील विविध विकास प्रकल्पांच्या पाठपुराव्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेले दोन दिवस दिल्लीत अनेक नेत्यांच्या भेटी घेतल्या. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय आरोग्यमंत्री आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथसिंग, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान, केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर तसेच नीती आयोगाशी या बैठका झाल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची संसद भवनात सदिच्छा भेट घेतली. महाराष्ट्राशी संबंधित विविध प्रकल्पांवर तसेच विषयांवर त्यांनी चर्चा केली. सुमारे 25 मिनिटे ही बैठक चालली. मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय मंत्री राजनाथसिंग यांचीही सदिच्छा भेट घेतली आणि विविध विषयांवर त्यांच्याशी चर्चा केली. केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर आणि हरयाणाचे मुख्यमंत्री नायबसिंग सैनी यांचीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत सदिच्छा भेट घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेतली आणि त्यात जागतिक वित्तीय संस्थांकडून विविध प्रकल्पांसाठी केंद्रीय आर्थिक व्यवहार मंत्रालयाकडून परवानगी देण्याची मागणी केली. महाराष्ट्राने आपली अर्थव्यवस्था सर्व निकषांवर उत्तम राखल्याबद्दल निर्मला सीतारामन यांनी यावेळी प्रशंसा केली. या प्रकल्पांमध्ये 1000 लोकसंख्या असलेल्या गावांना काँक्रिट रस्त्यांनी जोडण्यासाठीचा प्रकल्प आहे. यासाठी आशियाई डेव्हलपमेंट बँकेकडून 1 अब्ज डॉलर्स (सुमारे 8651 कोटी रुपये) इतके आर्थिक सहाय्य मागण्यात आले आहे. दुसरा प्रकल्प महाराष्ट्रातील समुद्रकिनाऱ्याची पातळी वाढत असल्याने त्याचे नैसर्गिक उपायांनी निराकरण करणे हा आहे. यासाठी 500 मिलियन डॉलर्स (सुमारे 4326 कोटी रुपये) इतकी मदत मागण्यात आली आहे. तिसरा प्रकल्प महापालिका शहरांमधून सांडपाण्याचा प्रक्रिया करुन उद्योगांसाठी पुनर्वापर हा आहे. यासाठी 500 मिनियन डॉलर्सचे (सुमारे 4326 कोटी रुपये) अर्थसहाय्य मागण्यात आले आहे. उर्वरित दोन प्रकल्पांसाठी जागतिक बँकेकडून मदत मागण्यात आली आहे. या तिन्ही प्रकल्पांसाठी वित्तमंत्रालयाने मंजुरी द्यावी, यासाठीचे निर्देश निर्मला सीतारामन यांनी या बैठकीत दिले. या बैठकीला वित्त विभाग सचिव अनुराधा ठाकूर, मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी आणि मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे उपस्थित होत्या. केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांच्या भेटीत विदर्भात एक खतांचा मोठा प्रकल्प उभारण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चर्चा केली. नागपूर जिल्ह्यात गेल, फर्टिलायझर विभाग आणि महाराष्ट्र सरकारच्या संयुक्त उपक्रमातून हा 12.7 लाख टनाचा प्रकल्प असणार आहे. सुमारे 10,000 कोटींचा हा प्रकल्प असणार आहे. या प्रकल्पासाठी सबसिडी देण्याची मागणीही करण्यात आली आहे. यासंदर्भातील मंत्रिमंडळ प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना जे. पी. नड्डा यांनी दिल्या. फर्टिलायझर विभागाचे सचिव रजतकुमार मिश्रा यावेळी उपस्थित होते. महाराष्ट्रात 14,000 कि.मी.चे रस्ते तयार करण्यासाठीचा एक प्रस्ताव महाराष्ट्राने केंद्रीय ग्रामविकास मंत्रालयाकडे दिला आहे. हा एकूण प्रस्ताव 2.6 बिलियन डॉलर्सचा (सुमारे 22,490 कोटी रुपये) असून, यातच एडीबीचे सहाय्य घेण्यात येणार आहे. 25 वर्ष मेंटेनन्स फ्री या तत्त्वावर हे रस्ते उभारण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांसाठी हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प ठरेल, यातून त्यांना चांगली कनेक्टिव्हीटी मिळेल, असे शिवराजसिंग चौहान यांनी सांगितले. या प्रकल्पाला मदत करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केली. महाराष्ट्रात प्रधानमंत्री आवास योजनेत सर्वेक्षणाचे काम अतिशय गतीने केल्याबद्दल शिवराजसिंग चौहान यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले. महाराष्ट्रात देशात सर्वाधिक 30 लाख घरे केंद्र सरकारने मंजूर केली आहेत, हे याठिकाणी उल्लेखनीय.

## सुमीत खंडारे यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार जाहीर

बातमी जगत | प्रतिनिधी

**मेहकर :** भाऊ फाऊंडेशन पँथर्स महाराष्ट्र राज्य व शाकतोकान कराटे व क्रीडा मंडळ जालना, यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय पुरस्कार 2025" यांच्या राज्यस्तरीय पुरस्कार "सोहळा चे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षी त्यामध्ये विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या लोकांना मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते .यामध्ये नुकतेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे सामाजिक कार्यकर्ते , सुमीत रामकिसन खंडारे यांची राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. असे पत्र या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक भाऊ फाउंडेशन पँथर्स महाराष्ट्र राज्य यांनी दिले आहे. त्यांच्या



या सामाजिक कार्याची दखल घेत,त्यांची निवड राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कारसाठी करण्यात आली आहे. जालना येथे होणाऱ्या या भव्य दिव्य कार्यक्रमांमध्ये मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. त्यांच्या या निवडून मुळे विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## पीक हातचे गेल्याने व डोक्यावरील कर्जामुळे होते हतबल ! दुर्दैवी घटनेने भरोसा गावात शोककळा

बातमी जगत | प्रतिनिधी

**चिखली :** तालुक्यातील भरोसा येथे शेतकरी दाम्पत्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून, सोयाबीन पिकावर झालेला ह्युमनी अळीचा प्रकोप, सततची नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून या दाम्पत्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगण्यात येत आहे. गणेश श्रीराम थुट्टे (वय ५५) व रंजना गणेश थुट्टे (वय ५०) अशी या दाम्पत्याची नावे आहेत. सायंकाळच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला. पती-पत्नीचे मृतदेह निंबाच्या झाडाला लटकलेले पाहून समाजमन सुन्न झाले होते. भरोसा गावासह परिसरात एकच हळहळ व्यक्त होत होती. सततची नापिकी, ह्युमनी अळीचा प्रादुर्भाव, वाढती कर्जबाजारी आणि शासनाच्या





मदतीचा अभाव या साऱ्या कारणांनी अजून दोन जीव गेल्याचा संतापही परिसरातून व्यक्त होत होता. गणेश थुट्टे व रंजना थुट्टे हे शेतकरी दाम्पत्य भरोसा शिवारातील गट नंबर ३१७ मध्ये असलेली त्यांची पाच एकर शेती कसून आपली उपजीविका भागवत होते. परंतु, सोयाबीन पिकावर ह्युमनी अळीचा प्रकोप झाल्यानंतर ते खचून गेले होते. डोक्यावर असलेला कर्जाचा डोंगर आणि सोयाबीन पीकही हातातून गेल्याने ते हतबल झाले होते. त्यामुळे नैराश्यात गेलेल्या या थुट्टे दाम्पत्याने आज दुपारच्या सुमारास शेतातील निंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेची माहिती कळताच अंढेरा पोलिस ठाण्याचे ठाणेदार रूपेश शक्करगे यांनी घटनास्थळी धाव घेत, दोन्ही मृतदेह झाडावरून खाली उतरून शवपरीक्षणासाठी चिखली येथील ग्रामीण रुग्णालयात रवाना केले. या दुर्दैवी घटनेने परिसरात एकच हळहळ व्यक्त होत असून, नैसर्गिक प्रकोप व सरकारच्या उदासिनतेमुळे एका शेतकरी दाम्पत्याला प्राण गमवावे लागल्याची भावना व्यक्त होत होती. मृत थुट्टे दाम्पत्याला एक मुलगा व दोन मुली अशी अपत्ये असून, या दुर्दैवी घटनेची फिर्याद एकनाथ प्रभाकर थुट्टे यांनी अंढेरा पोलिसांत दाखल केली आहे.आज दुपारच्या सुमारास हे थुट्टे दाम्पत्य व त्यांची सून हे शेतात जावून काम करू लागले, तर व तीन वर्षे वय असलेल्या नातीला जवळ ठेवून या दाम्पत्याने सुनेला शेळ्या चारण्यासाठी पाठविले. सून शेळ्या घेवून दूर गेल्याचे पाहून गणेश थूट्टे यांनी एका लिंबाच्या झाडाला आणि पत्नी रंजना थूट्टे हिने दुसऱ्या लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनास्थळी मन हेलावणारे दृश्य पाहून अनेकांच्या हृदयाचा थरकाप उडाला.

## पान एक वरून

**अभिनेत्री अनित पड्डाने 'सैयारा' या तिच्या पहिल्या चित्रपटातून यशाची चव चाखली आहे. चित्रपटाच्या यशानंतर, अनित पहिल्यांदाच सार्वजनिक ठिकाणी दिसली आहे. २३ जुलै रोजी, अनित मुंबईतील एका सलूनबाहेर दिसली, जिथे ती छायाचित्रकारांना भेटली. व्हायरल व्हिडिओमध्ये, अनित निळ्या डेनिम आणि मॅचिंग शर्टमध्ये दिसत आहे. तिने चेहऱ्यावर मास्क देखील घातला आहे. सलूनबाहेर फोटोग्राफर्स आणि गर्दी पाहून ती थक्क झाली, त्यानंतर तिला ताबडतोब गाडीत नेण्यात आले. अनितने केवळ फोटोग्राफर्सना टाळले नाही, तर एका चाहत्याची सेल्फी घेण्याची विनंतीही नाकारली. चाहत्याच्या सेल्फी रिक्वेस्टला नकार दिल्याबद्दल सोशल मीडियावर संमिश्र प्रतिक्रिया येत आहेत.**

## सचिन व्यास यांची अमरावती विभागीय सोशल मीडिया प्रमुख पदी निवड

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ राजेश पंडित

**देऊळगाव राजा :** दिनांक 25 जुलै 2025 देऊळगाव राजा शहरातील उच्च शिक्षित व तळमळीने शिवसेना पक्षाच्या विस्तारासाठी काम करणारे सच्चे शिवसैनिक सचिन व्यास यांची नुकतीच अमरावती विभागीय सोशल मीडिया प्रमुख म्हणून पक्षातर्फे नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे देऊळगाव राजा शहरात व संपूर्ण अमरावती विभागात शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. सचिन व्यास हे माजी आमदार कॅप्टन अभिजीत अडसूळ यांचे निष्ठावान समर्थक असून, त्यांनी गेल्या काही वर्षांपासून



सोशल मीडियाच्या माध्यमातून शिवसेनेचे विचार, धोरणे आणि कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य सातत्याने केले आहे.त्यांच्या या समर्पित कार्याची दखल घेत शिवसेना पक्षाने अमरावती विभागाच्या सोशल मीडिया प्रमुख पदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आहे. या वेळी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करताना शिवसेना राष्ट्रीय सचिव व बुलडाणा जिल्हा निरीक्षक माजी आमदार कॅप्टन अभिजीत अडसूळ, आमदार धर्मवीर संजय गायकवाड, माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर, जिल्हा प्रमुख प्रा. बळीराम मापारी, जिल्हा उपप्रमुख दिनकर खरात, तालुका प्रमुख सुदाम काकड, शहर प्रमुख गोपाल व्यास यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. सचिन व्यास यांच्या या निवडीमुळे सोशल मीडियाच्या माध्यमातून शिवसेनेची ताकद आगामी काळात अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचेल, असा विश्वास पक्षातील वरिष्ठांनी व्यक्त केला आहे.

## आठ दिवसाच्या विश्रांतीनंतर पुन्हा दमदार पावसाला सुरुवात

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ इमरान सैय्यद

**मालेगांव :** यावेळी जून महिन्याच्या अखेरीस विक्रमी पाऊस पडला आहे.आता जुलै महिन्यात सुद्धा चांगला पाऊस पडणार असा हवामान खात्याने अंदाज वर्तविला होता. परंतु त्यात अडथळा निर्माण झाल्याने पावसाने आठ दिवसांचा खंड दिला आणि शेतकऱ्यांच्या समोर चिंता पसरली होती.परंतु मंगळवारी सकाळी साडे चारला विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाला सुरुवात झाली आहे.

सकाळी दोन तासात ३० मी.मी.पावसाची नोंद झाली आहे.दिलेल्या आठ दिवसांच्या उघाडीत शेतकऱ्यांनी महत्त्वाची कामे उरकून घेतली आहेत. डवऱ्याची पाळी साधली असल्याने तन आटोक्यात आलं आहे. आता पीक तासी लागली आहेत.



आठ दिवसांचा पावसाच्या खंडने चिंता जरी पसरली असती तरी; आता तो खंड फायद्याचा ठरला आहे.

आतापर्यंत शहर आणि परिसरात ४३० मी.मी.पाऊस पडला आहे.मागच्या वर्षिच्या जवळपास पाऊस पडत आहे.मागच्या वर्षी विस जुलै ते एकतीस जुलै या दहा दिवसांत सव्वादोनसे मी.मी.पाऊस पडला होता.तर; संपूर्ण जुलै महिन्यात ३६८ मी.मी.पाऊस झाला होता.यावेळी जुलै महिन्याच्या वीस दिवसांत फक्त १२५ मी.मी.पाऊस पडला आहे.

हवामान खात्याने या आठ दिवसांत व ऑगस्ट महिन्यात भरपूर पाऊस पडणार असा अंदाज वर्तविला आहे.त्यामुळे यावर्षी सुद्धा चांगला पाऊस पडणार असा निष्कर्ष काढला जात आहे.

## प्रथम पुण्यतिथीनिमित्त डॉ.एल. डी.पाटील यांच्या पुतळ्याचे अनावरण

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ किरण बांधणकर

**पेण :** पेण तालुक्यातील सुप्रसिद्ध डॉक्टर स्वर्गीय एल.डी. पाटील यांना प्रथम पुण्यतिथी निमित्ताने गुरुवार दिनांक २४ जुलै रोजी म्हाडा कॉलनी येथील रविराज फार्म हाऊस येथे भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. यावेळी त्यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी मुलगा मुलगी असा परिवार आहे

डॉ एल.डी. पाटील हे गरिबांचे डॉक्टर अशी त्यांची पेण तालुक्यात ओळख होती.ते आदिवासी आणि गरीब रुग्णांची अत्यल्प दरात तपासणी आणि उपचार करायचे. जर रुग्णाकडे पैसे नसतील तर ते मोफत उपचार ही करायचे. त्यामुळे



सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्यांच्या दवाखान्यात रुग्णांची गर्दी असायची. डॉक्टर एल डी पाटील यांच्या निधनानंतर त्यांच्या समाजसेवेचा वसा त्यांचा मुलगा डॉक्टर युवराज पाटील हे पुढे चालवतील असा विश्वास उपस्थित राहून दर्शविण्यात आला.

त्यांना आदरांजली वाहण्यासाठी उद्योगपती पी पी खारपाटील, राजाशेठ खारपाटील, परिक्षीत ठाकूर, समीर ठाकूर, ॲड हरिदास तोडेकर,सागरशेठ खारपाटील समीरशेठ खारपाटील,आर डी पाटील, भालचंद्र पाटील, अभिनंदन पाटील,जावई आणि मुलगी मनाली सिद्धेश भोईर, सोनाली संदेश पाटील,त्यांचे सुपुत्र डॉ युवराज पाटील. स्नेहल पाटील, पाटील परिवार , पेण मेडिकल असोसिएशनचे डॉक्टर्स आदींसह मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या आठवणीने भावनिक होऊन सर्वांच्या डोळ्यात अश्रू आले होते.

प्लॉट विकणे आहे
मेहकर येथील एन .ए. प्लॉट त्वरित विकणे आहे.
क्षेत्रफळ-1650 स्क्वेअर फुट
** ठिकाण **

ठिकाण : आस्था नगरी समोर,
डोणगाव रोड ,मेहकर. जि. बुलढाणा.
इच्छूकांनी संपर्क साधावा.
संपर्क
डॉ. अभिमन्यू काळे (देऊळगाव माळी)
(टिप- एजंटने संपर्क करु नये)
मो.नं.9921283872

**घटना - घडामोडी**



## "कावड चालतो भक्तीचा मार्ग; हर हर महादेवाच्या जयघोषात देऊळगाव राजा सज्ज!"

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ **राजेश पंडित**

**देऊळगाव राजा :** 25 जुलै 2025 शहरातील सर्व शिवभक्त आणि सकल हिंदू समाजाच्या भावनांना स्पंदन देणारा "देऊळगाव राजा कावड उत्सव 2025" यंदाही उत्साहात व भक्तिभावाने संपन्न होणार आहे. यंदाचा उत्सव सोमवार, दिनांक 4 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 4 वाजता ब्रम्हमुहूर्तावर सुरू होणार असून, त्यासाठी संपूर्ण रूपरेषा जाहीर करण्यात आली आहे. कार्यक्रमाची रूपरेषा पुढीलप्रमाणे आहे: दि. 30 जुलै 2025, रात्री – देऊळगाव राजा येथील कावड पथक घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग (वेरूळ) येथे पवित्र जल आणण्यासाठी रवाना होणार आहे. 4 ऑगस्ट 2025, सकाळी 7:00 वाजता – मेळातला महादेव मंदिर, सावखेड भोई रोड येथून पारंपरिक कावड यात्रा प्रारंभ होईल. सकाळी 4:00 वाजता (ब्र. मु.) – शहर प्रदक्षिणा करून खोरेश्वर महादेव मंदिरात पवित्र जलाभिषेक करून यात्रेचा भव्य समारोप होईल. कावड यात्रेसाठी अत्यंत महत्त्वाचे नियम:
ब्रम्हमुहूर्तावर स्नान करून पवित्र अवस्थेत सहभागी व्हावे.
बेल्ट (पट्टा) वापरण्यास सक्त मनाई – कावड खांद्यावर भक्तिभावाने वाहावी. मांसाहारी व व्यसनी व्यक्तींनी सहभाग न घेणे अपेक्षित.
शिस्तबद्ध रांगेत चालणे, कोणताही गोंधळ व ढकलाढकली टाळावी.
वाहतुकीला अडथळा होणार नाही, याची विशेष खबरदारी घ्यावी.
फक्त भक्तिगीते, भजन, हरिनाम संकीर्तन वाजवावे. पाण्याचे पात्र झाकण असलेले असावे – पवित्र जल रस्त्यावर सांडू नये. स्वच्छता पाळावी – कचरा फेकू नये. प्राथमिक उपचार पेटी, स्वयंसेवक व स्वयंरक्षक नियोजनबद्ध ठेवावेत. घोषवाक्ये देण्यात यावे कावड चालतो भक्तीचा मार्ग, नियम पाळू हीच असो भाग!" "कावड निघाली हर हर म्हणत, शिस्तीत जाई सर्वांना घेऊन!" "शिवरायांचा भक्त आहे जो, तो नियम पाळतो न चुकवतो!" एक सामाजिक संदेश:
> "शिवभक्त म्हणजे शिस्त, भक्ती आणि सामाजिक भान." "कावड ही भक्ती आहे, गोंधळ नाही – स्वच्छता आणि संयम यातच शिवशक्ती आहे." सर्वांना आवाहन करण्यात येत आहे देऊळगाव राजा कावड उत्सव समितीच्या वतीने सर्व शिवभक्त व सकल हिंदू समाज बांधवांना सादर आवाहन करण्यात येते की, आपण सर्वांनी या पवित्र यात्रेत भक्तिभाव, शिस्त आणि स्वच्छतेची जाणीव ठेवत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. हर हर महादेव!



## चोरी करायला आलेले मात्र खाली हात परतले

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ **वसंत पानसरे**

**ठाणे :** शहापूर तालुक्यातील गोठेघर हद्दीतील चिंतामणी प्लाझा या इमारतीमध्ये गुरुवारी रात्रीच्या सुमारास चार व्यक्ती चोरीच्या उद्देशाने इमारतीत प्रवेश करुन आले होते मात्र प्रत्येक इमारतीच्या दरवाजे भक्कम व डिजिटल लॉक असल्यामुळे त्यांना काही कुठेही चोरी करता आले नाही.मात्र इमारती महिला घाबरलेल्या आहेत चोर गोठेघर येथील चिंतामणी प्लाझा इमारत मध्ये वावरत असल्याने त्यांची संपूर्ण हालचाली इमारती मध्ये लागलेल्या सीसीटीव्ही कॅमेरेत कैद झाल्याने हे चोर चोरीच्या उद्देशाने इकडेतिकडे वावरत असल्याचे सदर व्हिडिओ मध्ये दिसून आले आहे.सदर घटनेमुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान महिलांनी व नागरिकांनी सावध राहण्याचे व काहि संशयीत आढळल्यास पोलिसांना संपर्क करण्याचे आवाहन शहापूर पोलिसांनी केले आहे.

# वरली मटका,जुगार अड्ड्यावर पोलिसांचा धडक छापा!: १९ आरोपी अटकेत

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ **दिलीप अवगण पाटील**



**वाशीम :** दिनांक २४ जुलै २०२५ रोजी मंगरूळपीर शहरात अवैधरित्या सुरू असलेल्या जुगार धंद्यावर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी, वाशिम यांना गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या खात्रीलायक माहितीच्या आधारे मंगरूळपीर येथील वीर भगतसिंग चौकातील अशोक परळीकर यांच्या टिनशेडमध्ये सुरू असलेल्या वरली मटका आणि `साईकृपा गेम पार्लर` वर धाड टाकण्यात आली. पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकल्यावर १४ इसम हे "टाईम ओपन" व "मिलन" नावाच्या जुगारावर तसेच व्हिडिओ गेमवर पैशांवर हार-जीतीने जुगार खेळताना आढळले. त्यानंतर पोलिसांनी अशोक परळीकर यांच्या मालकीच्या राजधानी गेस्ट हाऊस, मंगरूळपीर येथे देखील रेड केली. या ठिकाणी देखील ४ इसम व्हिडिओ गेमच्या माध्यमातून पैशांच्या हार-जीतीवर जुगार खेळताना आढळून आले. या दोन्ही ठिकाणी परवाना नूतनीकरण केलेला नसल्याचे आढळून आले असून, ग्राहकांना पैसे देऊन गेम खेळवून नंतर जिंकलेले पैसे पुन्हा देण्याचा प्रकार उघडकीस आला. सदर प्रकरणी रोख रक्कम ₹०,८००/-, १२ मोबाईल – ₹,३८,५००/-, डॉलर १००० मटका मशीन – ₹२,०००/-, ३ मोटारसायकल – ₹,९५,०००/-, मटका चिठ्ठ्या, रजिस्टर, कॅल्क्युलेटर – ₹००/-, २३ व्हिडिओ गेम मशिन ₹,०५,०००/-, २ इन्व्हर्टर व बॅटरी ₹१,०००/-,पांढरे व पिवळ्या धातूचे कॉईन जप्त करण्यात आलेला एकूण किंमत ₹२,४२,१००/- चा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.या कारवाईत एकूण १९ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये प्रमुख आरोपी अशोक परळीकरसह मंगरूळपीर, कोळंबी, पारवा, सवासनी येथील अनेक युवकांचा समावेश आहे. नामदेव उमाळे, सुमित माहोरे, महादेव कावरे, पवन खाडे, योगेश बंगाळे, विजय दावडा, विनोद वर्मा, रमजान परसुवाले, संतोष वानखेडे, हनिफ शेख, गुलाबराव खैरे, साबीर मोहनावाले, दिपक वाघ, सागर लुंगे, अशोक परळीकर, भागवत लांभाडे, शेख जावेद, रहिम नानगीवाले, गणेश मोरे आरोपीना अटक करण्यात आली. पोलीस अधीक्षक अनुज तारे व अपर पोलीस अधीक्षक लता फड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल, सपोनि. दिनेश शिरेकार व त्यांच्या पथकातील अधिकारी व कर्मचारी पोहेकॉ. हरिभाऊ कालापाड, पोहेकॉ. अरविंद राठोड, पोकॉ. स्वप्नील शेळके, पोकॉ. निकीन चोपडे, पोकॉ. गणेश बाजड, पोकॉ. मळघणे यांनी केली. सामाजिक पातळीवर खेळवले जाणारे व्हिडिओ गेम्स आता जुगाराचा प्रमुख माध्यम बनले असून त्याच्या आड मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होत असल्याचे या कारवाईमधून स्पष्ट झाले आहे.

## खंडाळा येथे भिंत कोसळ्ली; कोणतीही जिवित हानी झाली नाही

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ **गजानन राऊत**



**मेहकर :** बुलढाणा जिल्ह्याच्या मेहकर तालुक्यात सलग तीन ते चार दिवसापासून जोरदार पाऊस चालू असल्यामुळे खंडाळा येथे अवकाळी पावसामुळे रात्री येनुबाई सपकाळ रा. खंडाळा देवी ता. मेहकर जिल्हा बुलढाणा यांच्या घराची भिंत पावसामुळे कोसळून गेल्याची धक्कादायक घटना घडली असून यामध्ये कोणतेही जीवित हानी झाली नाही पण या कुंटुबाची काही किरकोळ संसार भांडी आणि इत्यादी साहित्य उध्वस्त झाले आसल्याची माहिती आहे हे कुटुंब झोपेत असताना अचानक रात्री च्या सुमारास ही भिंत कोसळून गेली राहत्या घराची मागची भिंत पावसामुळे कोसळली या मध्ये कुंटुबाचा कोणताही सदस्य नसल्या मुळे जिवीत हाणी टळली हे कुटुंब पुढच्या खोलीमध्ये असल्याने कोणालाही दुखापत झाली नाही परंतु ही भिंत पाठी मागच्या गल्ली मध्ये कोसळली यात जवळील असलेल्या रहिवाश्यांना देखिल धोका निर्माण होण्याची शक्यता होती पण ही भिंत जागीच पडल्या मुळे आजुबाजूच्या रहिवाशांना कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नसल्याचे सांगितले जात आहे पण ही मातीची भिंत असल्या मुळे जवळील असलेल्या नागरीकांना जीवित हाणी होण्याचा मोठा अनर्थ टळला सलग येणाऱ्या मुसळधार पावसामुळे ही भिंत कोसळून गेली व या घटनेचे तातडीने पंचनामे करून मदत मिळावी अशी मागणी या कुटुंबाकडुन होत आहे.

## मौजपुरी पोलीसांनी अवैद्य गौण खनिज वाहतूक करणाऱ्या च्या मुस्क्या आवळल्या

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ **सुरेश काळे**



**परतूर :** काल दि.26 जूलै रोजी हस्तेपिंपळगाव ते हिवर्डी रोड ने एक ट्रॅक्टर ट्रॉली सह अवैध वाळू ची वाहतूक करीत आहे, त्यानुसार आम्ही मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी गेलो असता तेथे एक ट्रॅक्टर भरधाव वेगाने हिवर्डी रोड ने जात असताना दिसले आम्ही त्यास थांबण्याचा इशारा केला असता सदर ट्रॅक्टर चालक याने भरधाव वेगाने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर पळवून त्यातील गौण खनिज वाळू ही रोड वर हिवर्डी येथील पुलावर खाली करून हिवर्डी गावच्या दिशेने पळून जात असताना आम्ही सदर ट्रॅक्टर पकडून चालक यास त्याचे नाव गाव विचारता त्याने त्याचे नाव विशाल अशोक सोळुंके रा.चितळी पुतळी व ट्रॅक्टर मालक भीमा घादगे रा.चितळी पुतळी असे सांगितले सदर ट्रॅक्टर मधील वाळू बद्दल विचारले असता त्याने सदर ट्रॅक्टर मधील वाळू ही दुधना नदी पात्रातून काढून आणले बाबत सांगितले. सदर ट्रॅक्टर चा सविस्तर पंचनामा करून ट्रॅक्टर ट्रॉली सह एकूण 6 लाख 05 हजार रुपये चा मुद्देमाल जप्त करून पोलिस ठाणे मौजपुरी येथे आणून लावले असून गुन्हा दाखल करण्याची प्रकिया चालू आहे. सदरची कामगिरी ही अजय कुमार बन्सल पोलिस अधीक्षक, जालना, आयुष नोपाणी साहेब, अप्पर पोलिस अधीक्षक, जालना, विशाल खांबे साहेब, उप विभागीय पोलिस अधिकारी ,उप विभाग, अंबड कॅम्प परतूर यांच्या मार्गदर्शनाखाली ,मिथुन घुगे, सहा.पोलिस निरीक्षक विजय तडवी, पोलिस उप निरीक्षक, सफौ/ ज्ञानोबा बिरादार, पोह/ राजेंद्र देशमुख, भगवान खरात, रंजना चव्हाण, पो.अंमलदार/ प्रदीप पाचरणे, सदाशिव खैरे, प्रशांत म्हस्के यांनी केली आहे.

## संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून तीन ग्रामपंचायत भवन मंजूर

### यापूर्वी सात कोटी खर्चातून ३८ ग्रामपंचायत भवनाचे बांधकाम पूर्ण

**बातमी जगत | प्रतिनिधी**





**मेहकर :** राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान अंतर्गत ग्राम विकास विभागाकडून वढव ,हिवरा खुर्द ,उकळी येथे नवीन ग्रामपंचायत भवन बांधकाम माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून मंजूर झाले आहे. ७५ लाख रुपये खर्च अद्ययावत ग्रामपंचायत भवन आणि नागरी सुविधा केंद्र बांधकाम करण्यात येणार आहे.

संजय रायमुलकर यांच्या कार्यकाळात मागील वर्षी लोणार तालुक्यात १३ तर मेहकर तालुक्यात २५ ग्रामपंचायत भवनाचे बांधकाम त्यांनी मंजूर करून आणले होते .सात कोटी रुपये खर्चून ही बांधकामे पूर्ण करण्यात आल्याने ३८ ग्रामपंचायतींना स्वतःचे सुंदर ग्रामपंचायत भवन उपलब्ध झाले आहे. लोणार तालुक्यातील धानोरा , शारा ,वडगाव तेजन ,गोत्रा, बागुलखेड, देऊळगाव वायसा, नांद्रा कोयाळी, गंधारी, येवती ,मातमळ ,शिवनी पिसा तर मेहकर तालुक्यातील सारशिव, बदनापूर, अंत्री देशमुख, चायगाव ,हिवरा साबळे ,सावंगी वीर, वडाळी, पांगरखेड, घुटी,लोणी (लव्हाळा), वरुड ,मांडवा समेत डोंगर, लव्हाळा, पेनटाकळी ,गणपुर ,घाटनांद्रा ,शहापूर, उसरण, नायगाव देशमुख, बाव्हई, कळपविहीर ,पारखेड, चिंचोली बोरे, कंबरखेड येथे ग्रामपंचायत भवनाचे बांधकाम काही ठिकाणी पूर्ण झाले आहे, तर काही गावांमध्ये प्रगतीपथावर आहे. संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून नवीन मंजूर झालेल्या वढव, हिवरा खुर्द ,उकळी येथील ग्रामपंचायत भवन बांधकामासाठी ग्राम स्वराज्य अभियानाअंतर्गत प्रत्येकी २५ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. वीस लाख रुपयांचे ग्रामपंचायत भवन बांधकाम आणि ५ लाख रुपये खर्चून नागरी सुविधा केंद्र खोलीचे बांधकाम करण्यात येणार आहे. मेहकर लोणार तालुक्यातील उर्वरित गावांमधील ग्रामपंचायत भवनासाठी निधी उपलब्ध करून देण्याचा महायुती शासनाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहे, असे संजय रायमुलकर यांनी सांगितले.

## लाठी,खेर्डा या गावांचा अतिदृष्टी समावेश करण्याची तीव्र मागणी

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ **दिलीप अवगण पाटील**



**वाशीम :** दिनांक 22 जुलै रोजी झालेल्या ढगफुटी पावसामुळे लाठी,खेर्डा खुर्द या गावांमध्ये झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत देण्याबाबत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे मंगरूळपीर तालुका अध्यक्ष राम पाटील सुर्वे यांनी मंगरूळपीर तहसीलदारांना निवेदन दिले आहे.

शेलुबाजार व परिसरात अलीकडेच झालेल्या ढगफुटी स्वरूपाच्या अतिवृष्टीमुळे शेकडो हेक्टरवरील पिकांचे मोठे नुकसान झाले असून, अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. पावसामुळे काही ठिकाणी जमिनी खरडून गेल्या आहेत, पिकं पूर्णतः पाण्यात बुडाली आहेत, रस्ते खचले असून शेतकऱ्यांना शेतीसाठी पुन्हा सुरुवात करणं अवघड झालं आहे. अशा परिस्थितीत शासनाने लाठी,खेर्डा खु बु या गावात तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करावी प्रत्येक शेतकऱ्याचा योग्य पंचनामा करावा व नुकसानभरपाई थेट खात्यावर जमा करावी, अशी अपेक्षा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे मंगरूळपीर तालुकाप्रमुख राम पाटील सुर्वे यांनी व्यक्त केली आहे

## समृद्धी महामार्गामुळे डोणगाव येथील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ **अनिल राठोड**



**डोणगाव :** नागपूर मुंबई समृद्धी महामार्ग लगत डोणगाव भाग 2 येथील शेतकऱ्यांचे समृद्धी महामार्गाच्या पाण्याच्या अतिप्रवाहामुळे तसेच पूर्वी पासून असलेले जुने अनेक छोटे मोठे नाले यांचा प्रवाह मार्ग बदलून एकाच नाल्यामध्ये पाणी मिळवून दिल्यामुळे शेकडो शेतकऱ्यांच्या जमिनी व त्यातील पिके खराळून गेली आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. सदरील समृद्धी लगत 270 चैनल नंबर जवळ असलेल्या नाल्याच्या कामाचे व्यवस्थानाबद्दल डोणगाव येथील शेतकरी यांनी जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा ,तहसील कार्यालय मेहकर, मुख्य कार्यकारी अभियंता एमएसआरडीसी कार्यालय मेहकर, केंद्रीय मंत्री खासदार प्रतापराव जाधव तसेच मेहकर विधानसभा आमदार सिद्धार्थ खरात यांना झालेल्या नुकसानीचे निवेदन दिले तसेच नुकसान भरपाई सह नाल्याच्या रुंदीकरण व खोलीकरण करून देण्याची मागणी केली गेली आहे 22 जुलै रात्री डोणगाव गोहगाव परिसरात खूप मोठ्या प्रमाणात पाऊस झाला त्या पावसाचे पाणी समृद्धी महामार्गावरून नाली द्वारे खाली येऊन समृद्धीला लावलेल्या कुंपणाच्या सिमेंट पाट्या तोडून हे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात शिरले त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान तर झालेच सोबत शेतीचे सुद्धा खरडून गेली चैनल नं270. पर्यंत दोन्ही बाजूंने नुकसान झाल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली तरी प्रशासनाने त्वरित पंचनामे करावे अशी शेतकऱ्यांची मागणी होत आहे डोणगाव परिसरात गोहगाव रोड लोणी गवळी रोड अशा अनेक ठिकाणी रस्त्यावरून नालीद्वारे खाली येणाऱ्या पाण्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान केले त्याची पाहणी करून पंचनामे करावे समृद्धी प्रशासनाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी सोबतच पुन्हा असे पाणी शेतात शिरून शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी उपाययोजना होणे गरजेचे आहे 22 जुलै रोजी झालेल्या पावसाने समृद्धी मार्गाला लावण्यात आलेल्या सिमेंटची कुंपण भी तुटली यावरून समृद्धी वरून खाली येणाऱ्या पाण्याचा दाब अति प्रमाणात असल्यामुळे समृद्धी प्रशासनाने पाण्याची कायमस्वरूपी उपाय योजना करणे गरजेचे आहे अशी तक्रार वसंतराव आखाडे तुळशीराम सोळंके दिलीप देवकर राजेश देवकर गजानन आखाडे तुषार आंबेकर आशिष आंबेकर प्रदीप आलेगावकर असे अनेक शेतकऱ्यांनी केली आहे.

